महाराष्ट्र वन विभाग

कार्यालय - ०२३१/२६५३६३२,
E-mail ID - ccfkolhapur@gmail.com

# महाराष्ट्र शासन

## मुख्यवनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

वनवर्धन", ताराबाईपार्क ,कोल्हापूर-४१६००३

---

क्रं.कक्ष-४-१/आस्था/विधी सल्लागार/२०२६-२७/318 कोल्हापूर - ३. दिनांक : 11/05/2026

प्रति,

मा. वरिष्ठ सहाय्यक संचालक (जाहिरात) (प्रशासन)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

विषय :- शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे...करार पध्दतीने विधी सल्लागाराचे नियुक्तीकामी जाहिरात देणेबाबत.

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७०५/प्रक्रं.१००/१३ दिनांक १७/१२/२०१६ अन्वये शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेकामी करार पध्दतीने विधी सल्लागाराचे नियुक्तीबाबत.जाहिरात देणेबाबतचे जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे.

तरी सदरची जाहिरात ही ज्या दैनिकांचा खप जास्त आहे, अशा जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

### जाहिरातीसाठी आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | मुख्यवनसंरक्षक ( प्रादेशिक ) कोल्हापूर |
| २ | वृत्तपत्रात सुचना प्रसिध्द होण्याचा अंतिम दिनांक अथवा ज्या दिनांकास प्रसिध्द होणे आवश्यक आहे, तो दिनांक | दिनांक : १४.०५.२०२६ |
| ३ | जाहिरातीचे बील कोणाकडे पाठवावयाचे आहे. | मुख्यवनसंरक्षक ( प्रादेशिक ) कोल्हापूर, वनवर्धन", ताराबाई पार्क, प्रधान डाक कार्यालयासमोर,रमणमळा, कोल्हापूर - ४१६ ००३ |
| ४ | जाहिरात किती वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची आहे व किती वेळा | कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधूदूर्ग व रत्नागिरी या जिल्हयातील ज्या दैनिकांचा खप जास्त असलेल्या अ वर्ग दैनिकामध्ये एक वेळेस प्रसिध्द करावे. |

(श्रीलक्ष्मी.ए) भावसे
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर

सहपत्र :- वरीलप्रमाणे जाहिरातीचा तपशील

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**
**जाहिरात.**

**शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे विधी सल्लागार एक पद भरतीबाबत**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर वनवृत्ताअंतर्गत शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी विधी सल्लागार ( Legal Adviser ) या पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागात करार पध्दतीने विधी सल्लागार ( Legal Adviser ) या पदावर इच्छूक असलेल्या उमेदवारांकडून महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेबर २०१३ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७०५/प्रक्रं.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ शासन निर्णयानुसार अर्ज मागविणेत येत आहे.

ज्या उमेदवारांना विधी विषयक कामकाजाचा अनुभव आहे अशा सेवानिवृत्त अधिकारी /सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश / सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी अर्ज करणे बंधनकारक आहे. **त्यामुळे इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/न्यायाधीश यांनीच अर्ज करावेत.**

तरी इच्छुक उमेदवारांनी खालील पत्यावर दि.१२.०५.२०२६ ते दि.३०.०५.२०२६ पर्यत शासकीय सुटटी वगळून कार्यालयीन वेळेत या कार्यालयास प्राप्त होतील याप्रमाणे आपलेकडील उपलब्ध बायोडाटासह अर्ज करावेत.

**पत्ता**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय,
"वनवर्धन" प्रधान डाक कार्यालय, कोल्हापूर समोर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३
दुरध्वनी क्रमांक-०२३१/२६५३६३२

या पदासाठीच्या आवश्यक अटी व शर्तीचा तपशील / अधिक महिती वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच वरील कार्यालयात उपलब्ध आहे.

**ठिकाण :- कोल्हापूर**
**दिनांक :- १४.०५.२०२६**

**(श्रीलक्ष्मी.ए) भावसे**
**अध्यक्ष तथा मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक)**
**कोल्हापूर**

# महाराष्ट्र शासन
## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.
### शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे करार पध्दतीने विधी सल्लागाराचे नियुक्तीबाबत जाहिरात देणेबाबत
## जाहिरात

कोल्हापूर वनवृत्ताकरीता शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे. - करार पध्दतीने विधी सल्लागाराचे पद भरण्याकरिता महाराष्ट्र महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेबर २०१३ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७०५/प्रक्रं.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ अन्वये वनविभागातील जमिन विषयी न्यायालयीन प्रकरणी, आस्थापना विषयी न्यायालयीन प्रकरणी तसेच, इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यास मदत व्हावी या दृष्टीकोनातून कोल्हापूर वनवृत्तासाठी (कोल्हापूर/सातारा/सावंतवाडी/सांगली/चिपळूण वनविभाग, कोल्हापूर/सातारा/सांगली/ रत्नागिरी/सिंधूदूर्ग सामाजिक वनीकरण विभाग / कार्यआयोजना विभाग/ वनसंरक्षक,तथा क्षेत्र संचालक सहयाद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर) करिता १ विधी सल्लागार यांची प्रथमत: एक वर्षाकरीता नेमणूक करावयाची आहे. तसेच, महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेबर २०१३ अन्वये विहीत केलेनुसार रु.50,000/- (पन्नास हजार) ठोक मानधन मासिक परिश्रमिक म्हणुन निश्चित करणेत येईल.

करार पध्दतीने विधी सल्लागार यांची निवड प्रक्रिया, शैक्षणिक अर्हता, अनुभव, अटी / शर्ती, कर्तव्य व जबाबदा-या पुढील प्रमाणे आहेत.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

१. विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधीत कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्व अट ठेवण्यात यावी.
२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
३. करारपध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावीत नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
४. उमेदवारास मराठी,इंग्रजी व हिंदी भाषेचे संपूर्ण ज्ञान असेल.

**वयोमर्यादा :-**

करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

**इतर अटी व शर्ती :-**

१. करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.
२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-याच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
३. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींने गुंतलेले हितसंबंध जाहिर करणे आवश्यक राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.

७. सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: करार पध्दतीने असेल. हे विधी सल्लागार शासकीय सेवक म्हणून गणले जाणार नाहीत. त्यांची नियुक्त सोबत जोडलेले परिशिष्ट-अ मधील विनिर्दिष्ट करारनामाच्या अधिन राहिल.

८. परिशिष्ट-अ मधील उल्लेखित सक्षम प्राधिकारी (Competent Authority) याचा अर्थ संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक असा आहे.

९. विधी सल्लागारास मानधन संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचेमार्फत आदा करणेत येईल.

१०. सदर नेमणूक ही या करार पध्दतीने प्रथमत: एक वर्षाकरिता करण्यात येईल. एक वर्षानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापी अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही याची काळजी सक्षम प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्त करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुन:श्च नियुक्त करणे आवश्यक आहे. असे सक्षम प्रधिकाऱ्यांचे मत झाल्यास,त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

११. संबंधित सक्षम प्राधिकारी शासनाच्या वतीने नियुक्तीचे वेळी संबंधिताबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. कराराचे विहित प्रपत्र परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आले आहे. कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबंधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाची जबाबदारी राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या विधी सल्लागांराना मानधन हे शासन निर्णय दिनांक १३ नोव्हेबर २०१३ मधील निर्णयाप्रमाणे राहतील.

**विधी सल्लागारांच्या जबाबदाऱ्या :-**

१. संबंधित वन अधिकाऱ्याकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. कोल्हापूर प्रादेशिक वनवृत्त व त्या अंतर्गत सर्व प्रादेशिक वनविभाग , सामाजिक वनीकरण विभाग तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कोल्हापूर विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वन अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधिन वन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी/तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिकाऱ्यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे. मात्र या बाबतची माहिती अद्यावत ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी वनविभागाच्या संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

४. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास,अपील/पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी, याबाबत दक्षता घेणे.

५. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

६. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वनविभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.

७. न्यायालयीन प्रकरणाचा निपटारा जलद होणेसाठी कार्यालयीन कामाकाजादिवशी उपस्थिती राहणे आवश्यक

**<u>नियुक्तीबाबतची प्रक्रिया :-</u>**

करार पध्दतीने विधी सल्लागार यांची नियुक्ती खालील समिती मार्फत, उमेदवारांकडून प्राप्त अर्जाची पडताळणी केल्यानंतर अर्हता पुर्ण करणा-या उमेदवारांच्या मुलाखतीव्दारे करण्यात येईल.

१) मुख्यवनसंरक्षक ( प्रादेशिक ) कोल्हापूर - अध्यक्ष
२) वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक सहयाद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर - सदस्य
३) विभागीय वनअधिकारी ( नियोजन ) कोल्हापूर - सदस्य
४) विभागीय वनअधिकारी ( दक्षता ) कोल्हापूर - सदस्य
५) उपवनसंरक्षक, वनविभाग कोल्हापूर - सदस्य
६) विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग कोल्हापूर - सदस्य
७) प्रशासकीय अधिकारी, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कोल्हापूर - सदस्य सचिव

उपरोक्त समितीमार्फत यशस्वी उमेदवारास नियुक्तीबाबत लेखी स्वरुपात मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, कोल्हापर यांचेमार्फत कळविण्यात येईल.

निवड झालेल्या उमेदवारास महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेबर २०१३ मधिल विनीर्दिष्ट करारनामा करणे बंधनकारक राहील. शासनाच्या वतीने मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर हे करारनामा करतील.

**अर्ज स्विकारण्याचा दिनांक : १८.०५.२०२६ ते दिनांक : २५.०५.२०२६ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.**

**अर्ज करण्याची पध्दत :-**

अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात त्यांने स्वत:चे संपुर्ण नाव, जन्म दिनांक, शैक्षणिक पात्रता, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक, इ. सुवाच्य अक्षरात अथवा संगणकीकृत करुन नमूद करावा, स्वाक्षरी करावी. तसेच स्वत:चे अलीकडील काढलेले पासपोर्ट साईज फोटो अर्जावर चिकटवावा. तसेच विधी सल्लागार करीता वर नमूद अटी व शर्तीनुसार आवश्यक सर्व शैक्षणिक अर्हतांचे, अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांचे छायांकित व साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात तसेच अर्ज व सर्व कागदपत्रे लिफाफ्यात बंद करुन खालील नमूद कार्यालयात पोष्टाव्दारे **दिनांक : ३०.०५.२०२६ पर्यत** पोहचेल अशा प्रकारे पाठवावे. विहीत तारखेनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र अर्जदारांना मुलाखतीकरिता वेगळयाने सुचित करण्यात येईल.

सदर पदाबाबत ज्यांना अर्ज करावयाचा आहे. त्यांनी खालील पत्यावर अर्ज करावेत. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय, वनवर्धन बिल्डींग, प्रधान डाक कार्यालय कोल्हापूर समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३ दुरध्वनी क्रमांक - ०२३१-२६५३६३२**

www.mahaforest.gov.in

सही /-
अध्यक्ष तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कोल्हापूर

# एक वर्षाकरिता करार पध्दतीने विधी सल्लागाराचे नियुक्ती बाबत अर्ज

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
कोल्हापूर

आपले कार्यालयाचे दिनांक -------- चे जाहिरीतीस अनुसरुन कोल्हापूर वनावृत्ताकरिता **एक वर्षाकरिता करार पध्दतीने विधी सल्लागाराचे** नियुक्ती करावयाच्या करार पध्दतीने विधी सल्लागार पदाकरिता अर्ज सादर करीता आहे.या करिता आवश्यक असलेली माझी संपुर्ण माहिती खालील प्रमाणे देत आहे.

१. संपुर्ण नाव.(मराठी व इंग्रजीमध्ये) :- -------------------------------------------------------
२. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता,दुरध्वनी,भ्रमणध्वनी क्रं व ईमेलसह:- --------------------------------
३. जन्मतारीख:-----------------------------------------------------------------------------
४. कायदेविषयक शैक्षणिक अर्हतेचा तपशिल:-- प्रमाणपत्रासह

| अ.क्र. | अर्हतेचा तपशिल | विद्यापीठाचे नांव | पदवीचे वर्ष | प्राप्त गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५. सनद क्रमांक व दिनांक :-
६. सनद जारी करणारे प्राधिकर ण् :-
७. सेवानिवृत्ती तारीख :-
८. सेवानिवृत्ती पुर्वी, धारण केलेले शेवटचे पद :-
९. यापुर्वीचे सेवेचा तपशिल :-

| अ.क्र. | कार्यालयाचे / प्राधिकरणाचे नाव | सेवा कालावधी | सेवेच्या काळातील पदनाम |
|---|---|---|---|
| | | | |

१०. विधी व्यवसायी असल्यास व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक :-
११. अवगत असलेल्या भाषांचा तपशिल :-
१२. वनविभाग अथवा आस्थापना विषयक बाबी संबंधी वकीली व्यवसायाशी निगडीत विशेष प्रकरणे हाताळली असल्यास त्याबाबतचा थोडक्यात तपशिल (१० ओळी) :-

ठिकाण -
दिनांक -

आपला/ आपली विश्वासू,
(अर्जदाराची स्वाक्षरी नावासह)

**प्रमाणपत्र**

मी श्री ----------------------------याव्दारे प्रमाणित करतो/करते की, या अर्जामध्ये नमूद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची किंवा खोटी आढळलेस मी नेमणुकीचे प्रक्रियेमधून वगळण्यास पात्र ठरेन. तसेच माझी उक्त पदी निवड झाल्यास महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेबर २०१३ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७०५/प्रक्रं.१००/१३ दिनांक १७/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाणे मधील नमूद सर्व अटी / शर्ती मला मान्य राहतील.

ठिकाण -
दिनांक -

आपला/ आपली विश्वासू,
(अर्जदाराची स्वाक्षरी नावासह)

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६ दिनांक १३ नोव्हेंबर २०१३ चे शासन निर्णयाप्रमाणे

**परिशिष्ट-अ**

# AGREEMENT

This agreement is made at Kolhapur on ---------------- between the Governor of State of Maharashtra exercising the Executive Powers of the Government of State of Maharashtra through Shri----------------------- COMPENTENT AUTHORITY, having his office at Kolhapur hereinafter referred to as the Government" (which expression shall unless it be repugnant to the context or meaning thereof be deemed to its successors, agents and permitted assignee)as the first party and the competent authority.

WHEREAS the Government has decided to appoint Shri ---------------- as legal consultant on contract basis. Accordingly, the Revenue and Forest Department, Government of Maharashtra has advertised in daily newspaper inviting applications for the post of legal consultant in accordance with the provisions of Government Resolution NO. Misc-2705/ C.No 100/ 13, dt 17/12/2016.

AND WHEREAS in pursuance to the above advertisement, the candidates possessing minimum qualification prescribed for had applied and were subsequently called for interview for the said post of legal consultant.

AND WHEREAS after holding the interview of candidates called for interview for the post of legal consultant Shri ----------------------- was invited for accepting his selection as legal consultant for a period of 11 months on the consolidated remuneration of Rs. -------------------/- (on words Rs.---------------------) on the terms and conditions as stated herein below.

AND WHEREAS Shri ------------------ has vide his letter dt. ------------------- accepted the offer regarding appointment as a on contract basis on the terms and conditions prescribed in this Agreement.

AND WHEREAS Shri ------------------------ has therefore agreed and consented to execute an agreement.

THEREFORE NOW THIS AGREEMENT WITNESS AND IT IS HEREBY AGREED AND DECLARED SO BY AND BETWEEN THE PARTIES HERE TO AS FOLLOWS.

1. The first party hereby agrees to appoint Shri ------------------- as a legal consultant on contract basis for a period of 11months commencing from Dated ------------------ to --------------------- and consolidated remuneration will be payable at the end of each Calendar month according to Christian Calendar. It is agreed that II nd party shall not be entitled for separate T.A. and D.A. during the contract period .However competent authority may sanction the T.A. under compelling and exceptional circumstances.

2. The **Chief Conservator of Forests, (T) Kolhapur** and concerned competent authority will have full administrative control over the second party and second party is bound to perform duties, as per General and Special instructions set forth by the first party. Failure to do so shall be treated as breach of agreement/contract and will be liable for termination of this agreement.

3. The duties for the post of legal consultant are mentioned in **Para No.4 of G.R.No.s30/12/2012/C.R.233/F-6 dt.13thNov.2013,** annexed to this Agreement as schedule-I. It is agreed the duties prescribed in the schedule-I are not exhaustive but are illustrative and second party will be bound to perform its duties, as directed by the competent authority from time to time. The second party shall carry out its duties as mentioned in Para No.4 of G.R.No.30/12/2012/C.R.233/F-6 dt.13thNov.2013 and abide by orders/instructions issued by the first party with due diligence and efficiency during period of contract.

4. In case of any default on the part of the party no.II, if the Government suffers financial loss or damage then the Government will be at the liberty to recover the

said loss/damage from party no.II. It shall have charge on the amount of remuneration payable to party No.II

5. Assignment of 11 months contract is renewable for a further two terms of 11 months each (i.e..total 3 terms )subject to the satisfaction of competent authority and recording the reasons for same in writing. The contract however will be signed at the end of each term.

6. The second party will not be entitled to claim any rights, interest & benefit whatsoever of the permanency in the Government.

7. The first party will be at liberty to terminate this agreement without assigning any reason before completion of the tenure of 11 months and without giving prior notice in writing.

8. The Party No.II will also be at liberty to terminate this agreement by giving one month prior written notice to first party.

9. In the event of clause 7 and 8, the first party shall be liable to pay proportionate remuneration to the second party till date of termination of the agreement.

10. The party no.II shall hold confidence and shall not disclose to any person any information, documents, official secrets from office record assigned to it. The party no.II shall take due care to maintain the confidentiality of such information, documents, official secrets. The party no.II shall be fully responsible for any disclosure or misuse of such information, documents and official secrets. The second party will have to maintain utmost secrecy and confidentiality at all times as regards any information or knowledge obtained/gathered during the said contractual period, and will not indulge in any activity prejudicial to the interest of the Revenue & Forest Department or Government. It will not engage simultaneously in any activity of court case prejudicial to interests of or against the Forest Department.

11. The Normal working hours for Party No.II shall be as determined by the concerned competent authority from time to time.

12. If at any time, the Competent Authority is of the opinion that integrity of the second party is doubtful or in a negligent manner or violative of any terms / conditions of this contract, then in that event, then it shall be lawful for the Competent Authority to terminate the Contract without giving any prior notice to the second party.

13. After termination of this agreement, the second party shall be bound to return all office records, papers, documents, books or other material related to official matters in its custody, to the first party immediately. He shall not disclose any details in future concerning any matter in any manner whatsoever so that the interests of first party are not compromised adversely.

14. The second party shall not be entitled to any kind of leave and he will not leave the headquarter or duty without prior permission of the competent authority during the period of contract.

15. Absence of the second party at the work for more than 10 days without prior information to the Competent Authority or without any sufficient cause, would automatically amount to termination of this contract requiring no notice or intimation to the second party and II nd party shall not be entitled for the remuneration for the period of absence.

16. In case the second party could not attend the work with prior permission of the first party, it shall be entitled to proportionate remuneration only for the period he actually attended the work.

17. It is agreed that during the aforesaid period of contract second party will not undertake any private work / profession as legal practitioner, except after taking special permission from the competent authority. If the competent authority is satisfied that such work affects the performance of duties and the same against interest of state, the competent, authority may refuse permission of such work. Despite such refusal of permission, if second party accepts/continues to do, the agreement/ appointment shall stand terminated and if any loss/damage is caused to

the Government due to such act of the second party it will be liable for action as per law.

18. The second party shall not delegate any of his rights and duties and obligation under this agreement to any third person.

In witness whereof the parties hereto have both caused this agreement to be executed on the day and year written herein above.

SIGNED, SEALED AND DELIVERD BY THE

( Sree Lakshmi.A)
Chief conservator of forests (T) Kolhapur
On behalf of the Governor of Maharashtra,

Through competent Authority and first party Sree Lakshmi. A, Chief Conservator of Forests (T), Kolhapur

1st party. In the presence of

1 Divisional Forest Officer (Palnning),C.C.F.Office Kolhapur

2. Administrative Officer, C.C.F.Office Kolhapur

SIGNED AND SEALED BY Shri ----------------------------.

2nd party.

In the presence of

1.

( )

2.

( ),